Vol 6 Issue 9 October 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

ISRJ Indian Streams Research Journal

# सामाजिक शास्त्रांमधील संशोधनाची संकल्पना

प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.



## प्रास्ताविक

भारत हा विकसनशील देश आहे. या खंडप्राय देशात विविध जाती–जमातीचे, धर्माचे, पंथाचे लोक राहतात. या देशाला कधी जातीय संप्रदायवादाला तर कधी धर्मसंप्रदायाला सामोरे जावे लागते. 21 व्या शतकात आपल्या राष्ट्राने जरी विज्ञान आणि तंत्रज्ञानात भरारी घेतली असली तरी जातीयतेची चौकट अजूनही टिकून आहे. रुढी परंपरांच्या जोखंडाखाली अजूनही भारतीय स्त्री बंदीस्त आहे. अंधश्रद्धांचे मोठे सावट भारतीय समाजव्यवस्थेवर आजही आहे. या सर्व बाबींतून सुटका होण्यासाठी आणि समाजात एक वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी सामाजिक घटनांचे आणि समस्यांचे समाजशास्त्रीय संशोधन होणे गरजेचे आहे. ''आपला देश आज देखील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्यांना सामोरा जात आहे. जातीवाद, प्रांतवाद, भाषावादाचा राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होतो. म्हणूनच सामाजिक संशोधनाच्या आधारावर समाजातील अज्ञान दूर करणे शक्य आहे.''[1]

सामाजिक संशोधनात सामाजिक घटनांचा अभ्यास केला जातो. नवीन तथ्यांचा शोध आणि जुन्या तथ्यांचे परिक्षण केले जाते. मानवी वर्तनामधील कार्यकरण संबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न सामाजिक संशोधनात केला जातो. सामाजिक संशोधनाचा प्रामुख्याने उपयोगीतावादी उद्देश असतो. ''सामाजिक जीवनाच्या संबंधातील समस्या सोडविण्यासाठी सामाजिक संघटन टिकवून ठेवण्यास सामाजिक संशोधन हे महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. सामाजिक संशोधन हे सामाजिक जीवनाच्या संबंधात आपल्या ज्ञानाचा एक अतिशय महत्त्वाचा शोध घेते. हे ज्ञान आपल्याला सामाजिक समस्या सोडविण्यासाठी आणि सामाजिक जीवनास अधिक प्रगतीशील बनविण्याकरिता आवश्यक योजना तयार करण्यासाठी अतिशय उपयोगी आहे. समाजात असलेल्या प्रथा, परंपरांचे संशोधन करुन समाज प्रबोधनाच्या क्षेत्रात मोलाची भूमिका पार पाडली जाते. सामाजिक संशोधन व्यवहारीकदृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण असते.[2] समाजव्यवस्थेचा अतिशय सूक्ष्म अभ्यास या माध्यमातून केला जातो. सामाजिक संशोधनातून प्राप्त ज्ञान अतिशय उपयुक्त असते. सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंचा, समस्यांचा बारकाईने अभ्यास यामध्ये केला जातो. समाज विकासाच्या योजना तयार करण्यासाठी सामाजिक संशोधन विशेष महत्त्वपूर्ण आहे. थोडक्यात सामाजिक जीवन व घटनांच्या संबंधात यथार्थ ज्ञान सामाजिक संशोधनातून प्राप्त होते.

## संशोधनाचा अर्थ

1)वेबस्टरच्या शब्दकोशानुसार 'संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे अथवा तथ्ये यांचे पुन्हा–पुन्हा परिक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय.''

2) रेडमन आणि मोरी यांनी संशोधनाची व्याख्या करतांना संशोधन म्हणजे नवीन ज्ञान संपादनासाठी केलेला पद्धतशीर प्रयत्न असे म्हटले आहे.

वरील व्याख्यांवरुन बुद्धीनिष्ठ आणि व्यावहारिक प्रश्नांची आणि समस्यांची शास्त्रीय पद्धतीद्वारे समाधानकारक उत्तरे शोधून काढण्याचा संशोधन हा एक पद्धतशीर प्रयत्न असतो. संशोधन करतांना सुत्रबद्ध पद्धतीचा वापर करणे गरजेचे असते.

संशोधक शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करुन ज्ञान प्राप्त करण्याचा

प्रयत्न करतो. सामाजिक संशोधनाचे स्वरुप वैज्ञानिक आहे. म्हणून कोणत्याही सामाजिक घटनेचे किंवा समस्येचे अध्ययन हे वैज्ञानिक पद्धतीद्वारा केले जाते. नैसर्गिक किंवा भौतिक आणि सामाजिकशास्त्रे यातील वैज्ञानिक पद्धत ही सारखीच आहे. भौतिक विज्ञानामध्ये वैज्ञानिक पद्धतीच्या ज्या पायऱ्या आहेत त्याच पायऱ्या सामाजिक शास्त्रांच्यादेखील आहेत. संशोधन करणे ही एक संकीर्ण तथापी नियोजनबद्ध प्रक्रिया आहे. ''जिज्ञासा व ज्ञानसाधना हे मानवाचे असामान्य गुण आहेत. शास्त्र हे वस्तुस्थितीचे केवळ चित्रण नसते तर वस्तुस्थितीच्या आधारावर केलेली काही रचना असते. अभ्यासविषय कोणताही असला तरी अभ्यासविषयासंबंधीची माहिती कोणत्या पद्धतीने संकलीत केलेली आहे. ज्ञान मिळविणे, सत्य शोधून काढणे यासाठी माणसाची अव्याहतपणे धडपड चालूच असते. पण तर्कशास्त्राच्या मूलभूत तत्त्वानुसार हे ज्ञान मिळविले पाहिजे. कारण संशोधनाची बैठक ही अधिक तार्कीक व वस्तुनिष्ठ असली पाहिजे. अभ्यासविषयासंबंधी शोधलेले पुरावे, त्यातील क्रम, त्यांचा संबंध, कार्याकारण भाव इत्यादी लक्षात घेवून अत्यंत तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठ असली पाहिजे. अभ्यासविषयासंबंधी शोधलेले पुरावे, त्यातील क्रम, त्यांचा संबंध, कार्यकारणभाव इत्यादी लक्षात घेवून अत्यंत तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठ पद्धतीने ज्या पद्धतीच्या सहाय्याने निष्कर्ष काढले जातात. त्या पद्धतीला वैज्ञानिक अभ्यासपद्धती म्हणतात.''[3]

शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करून उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे शोधणे हा संशोधनाचा प्रमुख उद्देश असतो. गुणात्मक संशोधनात वर्तमानाच्या हेतूचा शोध घेतला जातो. तर संख्यात्मक संशोधनात एखादी गोष्ट कितीवेळा, कितीकाळ घडते याची नोंद चिकित्सकपणे घेतली जाते. संशोधन शास्त्रशुद्ध कसे करावे तसेच मूलभूत हेतू, तर्क कसोटीला उतरणाऱ्या सत्याचा मागोवा घेणे होय. वस्तुनिष्ठता पूर्वकथन करण्याची संभाव्यता, एखादा शास्त्रशुद्ध सिद्धांताची निर्मिती इत्यादी शास्त्रीय पद्धतीमागची गृहीततत्त्वे आहेत. कोणत्याही घटनेचे विवरण, हे वस्तुनिष्ठ दृष्टिने व्हावयास हवे हे वैज्ञानिक अभ्यास पद्धतीत अभिप्रेत आहे. एखादी गोष्ट शोधून काढण्याची सविस्तर योजना म्हणजे संशोधन आराखडा होय.

सामाजिक शास्त्रात घटनांच्या हेतूचे विवरण जाणीवपूर्वक करावे लागते. समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र इत्यादी शास्त्रात मानवीकृती व अभिवृत्ती, इच्छा, आकांक्षा यांचेच प्रतिबिंब असते. त्यामुळे मानवी विश्वात घडणाऱ्या घटनांमागील प्रेरणांचा अभ्यास केवळ अनिवार्य नव्हे तर आवश्यक आहे. सुसंगत सामान्य सिद्धांत प्रस्थापित करण्यासाठी घटनांमधील हेतू कोणते होते याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

''ज्ञान हे विज्ञानाचे आधारभूत मूल्य आहे. सामान्यता ज्ञान ही एक प्रकारची जाणीव असते. आपल्या अनुभव कक्षेत येणाऱ्या विषयाची ती एक समज असते. शास्त्रीय ज्ञानाचा उगम हा मानवाच्या अनुभवविश्वातून होत असतो. सामाजिक समस्यांचे स्वरुप आणि कारणांच्या संशोधनाचा समावेश सामाजिक संशोधनाच्या अध्ययन क्षेत्रात होतो. सामाजिक समस्या या देखील सामाजिक जीवनाचे एक अभिन्न अंग आहे. कोणताही समाज हा सामाजिक समस्यांपासून वेगळा नाही.[5] म्हणून सामाजिक जीवन आणि अंतर्भूत प्रक्रिया व नियमांच्या संदर्भात आपले ज्ञान तोपर्यंत सामाजिक समस्यांचा कार्यकारण संबंधांचा शोध घेतला जात नाही.

''सामाजिक शास्त्रांमधील शुद्ध विज्ञानातील संशोधन हे शास्त्रीय संशोधन समजले जाते. सामाजिकशास्त्र आणि संशोधनामध्ये फ्रान्सचे सामाजिकशास्त्राचे विचारवंत ऑगस्त कॉन्त (1798—1857), फ्रान्सचे समाजशास्त्रज्ञ मॅक्सवेबर (1864—1920), इटलीचे समाजशास्त्रज्ञ विलफ्रेड पॅरेटो (1848—1923) आणि समाजशास्त्रज्ञ बोगार्डस यांनी अतुलनीय योगदान दिले आहे.''[6] सामाजिक घटनांचा अभ्यास आणि भविष्यकालीन अंदाज, सामाजिक घटनांचे निरीक्षण, समस्यांच्या संदर्भात आकडेवारी गोळा करून वर्गीकरण करणे व निष्कर्ष काढणे, तुलना करतांना निःपक्षपाती राहणे आणि सामाजिक सिद्धांताचा विकास करण्यावर भर देणे यामुळेच सामाजिक संशोधनाचा विकास होण्यास मदत झाली.

''सामाजिक संशोधनाच्या अध्ययनाची व्याप्ती संपूर्ण सामाजिक जीवन आणि त्यासंबंधीत सामाजिक प्रक्रिया आणि नियमांपर्यंत व्यापक आहे. याचाच अर्थ संशोधनकर्ता सामाजिक जीवनाच्या कोणत्याही विशिष्ट किंवा सामान्य घटनेचा संशोधनाचा विषय म्हणून निवड करू शकतो. ज्या विषयाच्या संदर्भात आजपर्यंत कोणतेच संशोधन झाले नाही असाच विषय संशोधनासाठी निवडला पाहिजे, कारण नवीन विषयाच्या अध्यनापर्यंत सामाजिक संशोधन क्षेत्र मर्यादित नाही. सामाजिक संशोधनात सांख्यिकी व आंतरसंबंध विश्लेषणाला जास्त महत्त्व दिले गेले. ज्यात सामाजिक संबंधातील वर्णनात्मक आकृतीबंध वा सामाजिक प्रक्रियेची संरचना यांचा संशोधक शोध घेत असतो.''[7] त्याचबरोबर संशोधक हा गुणात्मक पद्धतीनेही सामाजिक संशोधन प्रक्रियेचा शोध धेत असतो यामध्ये संशोधक हा मूल्यमापनासाठी संशोधन आणि विश्लेषणात्मक संशोधनाचाही अवलंब करतो. ज्ञानेंद्रीयांद्वारे आपल्याला प्रत्यक्ष ज्ञान मिळते. सर्व मानवी व्यवहार त्याच ज्ञानाच्या आधारे चालतात. ज्ञानातून वेगवेगळे शास्त्रे अस्तित्वात आली. कोणत्याही नवीन अध्ययनात विषयाची संशोधन कार्यासाठी निवड करून त्या संबंधित प्रक्रिया आणि नियमांचा शोध घेता येतो. सामाजिक संशोधनाचा मूलभूत उद्देश हा सामाजिक विश्व आणि त्यांच्या विविध घटकांचे आकलन करणे हा आहे. संख्यात्मक पद्धती आणि गुणात्मक पद्धती हे सामाजिक संशोधनाचे दोन प्रकार आहेत. सामाजिक शास्त्रांनी मात्र संख्यात्मक पद्धतीचाच अवलंब जास्त प्रमाणात केला आहे.

थामसन यांनी "Introduction to Science" या ग्रंथात स्पष्ट केले आहे की, ''अनुभवाधिष्ठीत ज्ञानाला तर्कशुद्धतेची, बुद्धीप्रामाण्यतेची व वस्तुनिष्ठतेची जेव्हां जोड दिली जाते. तेव्हाच शाश्वत ज्ञानाची मांडणी करता येते. स्थूलमानाने ज्ञानाचा संबंध अंतीम सत्याशी जोडण्याचा प्रयत्न केला जातो. मानवाचा ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न इतिहासाइतकाच जुना आहे. मानवाने सामाजिक समूह करून राहण्यास सुरुवात केली व आपल्या दैनंदिन गरजा अधिक चांगल्या रितीने भागविण्यासाठी सभोवतालच्या परिस्थितीचे वस्तुचे ज्ञान मिळवून त्याचा आपल्या सेवेसाठी उपयोग करून त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी ज्ञान उपयोगात आणले. म्हणजेच जे वास्तव असते त्यालाच वस्तुस्थिती मानावे अशी तत्त्वज्ञानाची धारा असते. बुद्धी, मन व इंद्रीये यांच्या प्रत्ययास जे येते अशा कोणत्याही वस्तु, पदार्थ, घटना, वास्तव वस्तुस्थिती या संस्थेस पात्र मानले जाते. म्हणजेच संशोधनात जी वस्तुस्थिती आहे त्यास सत्य मानले आहे. परंतु वस्तुस्थितीच्या संदर्भात केलेले विधान खरे किंवा खोटे, सत्य किंवा असत्य असू शकते. परंतु वस्तुस्थिती किंवा वास्तव (Reality) हा अंतीम सद्वस्तू विश्लेषणापलीकडील बाब म्हणून ओळखली जाते.

### सारांश

जागतिक स्पर्धेच्या युगात आपल्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आहे. भविष्यकालीन वाटचालीत जागतिक स्पर्धेत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी आणि एक वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी, जुन्या मूल्यांचा त्याग करता नवीन ज्ञानाच्या निकषावर त्याची चिकित्सा करणे आवश्यक आहे. सामाजिक मूल्य आणि संकल्पना संशोधनाच्या कसोटीवर तपासून वस्तूनिष्ठ ज्ञानाची प्राप्ती झाली पाहिजे. यावरच नव्या सिद्धांतांची मांडणी होत असते. नवनवीन शोध, अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता यातूनच राष्ट्रविकास घडत असतो. असे असले तरी त्यासोबत निकोप समाजनिर्मितीसाठी जुन्या संकल्पना, तथ्ये संशोधनाच्या अवस्थेतून तपासून ते समाज पटलावर येणे गरजेचे आहे. वैज्ञानिकतेच्या स्वीकाराबरोबरच जुन्या संस्था आणि संकल्पनांची वस्तुनिष्ठ ज्ञानाच्या आधारे पुर्नमांडणी करणेही आवश्यक आहे. संशोधनातून जातीयवाद, प्रांतियवाद, भाषावादाच्या विळख्यातून राष्ट्राला मुक्त करून वस्तुनिष्ठ सत्य विचार समाजासमोर आले पाहिजेत. गतकालीन मानवी जीवनाचा, जीवनपद्धतीचा, सर्वांगीण घडामोडींचा, परिवर्तनाचा विचार प्रवाहांचा शोध घेणे हे संशोधकाचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे.

### निष्कर्ष

संशोधन हे नवीन ज्ञानप्राप्तीसाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून करण्यात येते. शास्त्रीय पद्धतीने अज्ञानाची चिकित्सा केली जाते. नवीन ज्ञानाच्या प्राप्तीसाठी पद्धतशीर प्रयत्न केले जातात. सामाजिक शास्त्रांमधील संशोधन आणि भौतिकशास्त्रांमधील संशोधन यामध्ये मूलभूत फरक आढळून येतो. सामाजिक शास्त्रांमधील संशोधनात पक्षपात व व्यक्तीगत मतांचा प्रभाव असल्यामुळे त्याला वस्तुनिष्ठ स्वरुप प्राप्त होत नाही. म्हणून सामाजिक शास्त्रांच्या संशोधकाने संशोधन विषयाकडे सातत्याने लक्ष देवून संशोधन उद्देशांची निश्चिती केली पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे सामाजिक घटनांचा अभ्यास, कार्यकारण संबंधाचा शोध, वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग, नवीन तथ्यांचा शोध, जुन्या माहितीचे निरीक्षण आणि सांख्यिकीय विश्लेषण या बाबी सामाजिक संशोधनाच्या उद्दिष्टांमध्ये सामाविष्ट करून संशोधन करणे क्रमप्राप्त ठरते.

### संदर्भग्रंथ

1. आगलावे प्रदिप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर, 2000, पृ.28.
2. कऱ्हाडे बी. एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, 2009, पृ.17–18.
3. डॉ. अरवींद चौधरी व दिनेश भछुड, संशोधन पद्धती; वाणिज्य व व्यवस्थापन, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 2013, पृ. 13.
4. अलोणी डॉ. बोधनकर, सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशन, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.22.
5. भांडरकर पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, 2002, पृ.27–28.
6. घाटोळे रा. ना., समाजशास्त्री संशोधन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2001, पृ. 54–55.
7. पाटील वा. भा., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 2006, पृ. 52.



प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org